# छोट्याश्या सुट्टीत: प्रश्न जुने दृष्टिकोण नवा - सचिन कुंडलकर

**प्रा. गौतम बाब्या गमरे**
मोबाईल नं - ८८९८२१६७५५
Email Id - gamaregautam.gg.gg@gmail.com
डॉ. टी. के. टोपे कला आणि वाणिज्य रात्र महाविद्यालय, परेल, मुंबई- १२

---

'छोट्याशा सुट्टीत' हे नाटक सचिन कुंडलकर ह्यांचे असून ते २००५ मध्ये कर्नाटक प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे. प्रस्तुत नाटकाचा पहिला प्रयोग 'महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे ह्या संस्थेने दि १४ ऑगस्ट २००४ रोजी सुदर्शन कलामंच, पुणे येथे सादर केला. हे नाटक मोहित टाकळकर यांनी दिग्दर्शित केले आहे. 'छोट्याश्या सुट्टीत' हे नाटक दोन अंकी असून प्रत्येक अंकात सहा मिळून एकूण बारा प्रवेश ह्या नाटकात आहेत. नाटकाची प्रकृती (Mode) सामाजिक आहे. प्रस्तुत नाटकात उत्तरा, कार्तिक, व्योम, सायरस, पत्रकार, यशोदा ही रंगमंचावर येणारी पात्रे असून उत्तराची आई कुमुदिनीताई रंगमंचाबाहेरील पात्र आहेत.१९९० च्या दशकात भारतीय समाजात वेगवेगळ्या कारणांनी अनेक नवे सामाजिक प्रश्न सार्वजनिक पातळीवर चर्चेस आले. उदा. लिव्ह इन रिलेशनशिप, समलिंगी संबंध, स्त्री पुरुषामधील लिंगातील मैत्री इत्यादी ह्या प्रश्नाविषयी ह्याच काळात राजकीय सामाजिक आणि कायदा ह्या तीन पातळ्यांशी निगडित असलेल्या विविध बाजू वादाप्रवादातून उघड होऊ लागल्या. प्रस्तुत नाटकात हेच दोन प्रश्न केंद्रस्थानी असून ह्या प्रश्नांच्या सर्वांगावर २००५ मध्ये प्रकाश टाकण्याचा प्रयत्न हे नाटक करते. १९७० च्या दशकात शिक्षित स्त्रियांनी संघटित होऊन स्त्रीप्रश्नांच्या सोडवणूकीकरिता भारतात भिन्न भिन्न प्रदेशांमध्ये ज्या चळवळी उभ्या केल्या त्या चळवळीतून 'लिव्ह इन रिलेशनशिप' ही संकल्पना उदित झालेली दिसते. पारंपरिक लग्नबंधन व आनुषंगिक बंधने नाकारणे हा एक हेतू 'लिव्ह इन रिलेशनशिप' ह्या संकल्पनेमागे होता. उच्चशिक्षित स्त्री-पुरुषाने ही संकल्पना अल्पशा प्रमाणात स्वीकारली. प्रस्तुत नाटक मर्यादित वर्गाने स्वीकारलेल्या संकल्पनेला व त्या संदर्भातील मुखरित करू पाहते.

वर म्हटल्याप्रमाणे 'छोट्याश्या सुट्टीत' हे नाटक द्विकेंद्री असूनही दोन्ही केंद्रे ही विरोधलय संबंधावर आधारलेली आहेत. तसेच ह्या केंद्रांना समाज मान्यता नाही. त्यामुळे ह्या संबंधातील व्यक्तिकडे पाहण्याचा एकूण समाजाचा दृष्टिकोण ह्या संबंधामध्ये असलेल्या व्यक्तिव्यक्तिमधील ताणेबाणे व संघर्ष नाट्यगत विविध घटनांमधून व्यक्त होतो.

पहिला अंक ज्या घटनेने सुरू होतो त्या घटनेत असलेली दोन पात्रे अनुक्रमे स्त्री व पुरुष एकमेकांसोबत राहात असून ते अविवाहित आहेत. हे ठळकपणे पात्र-पात्रसंवादांतून सूचित केले जाते. तसेच ह्या दोन पात्रांचे (उत्तरा आणि कार्तिक) परस्परांशी असलेले संबंध हे सलोख्याचे परस्परांच्या मनाला महत्त्व असलेले दिसते. पहिल्या घटनेत उत्तरा ह्या पात्राचा शालेय मित्र परदेशातून येत असल्याची मेल येते आणि त्यानंतर त्या दोघांमध्ये जे संवाद होतात त्या संवादांतूनही ते दोघे आपापल्या जगण्याला पुरेसा अवकाश प्राप्त करून देत आहेत आणि तरीही सूक्ष्मपणे

पाहिल्यास ह्या नात्यातही काही ताणतणाव असल्याचे दिसते. प्रस्तुत नाटकात उत्तराचा मित्र सायरस त्याच्या 'गे' मित्रासोबत उत्तराच्या घरी येतो आणि त्यानंतर नाटकभर अविवाहित स्त्री-पुरुष (लिव्ह इन रिलेशनशिप) व समलिंगी जोडपे ह्यांच्या संवादांतून नाटक पुढे सरकते. मात्र पुढील अनेक प्रवेशांमधून उत्तरा - कार्तिक, सायरस, व्योम ह्या चार पात्रांमध्ये जे संवाद होतात त्या संवादांमधून रंगमंचीय अवकाशात पारंपरिक पद्धतीने घटना घडत नाहीत. पात्रांचे परस्परांशी होत असलेले 'संभाषण' हे उपरोक्त दोनही नात्यासंदर्भात वेगवेगळ्या प्रश्नांची मांडणी करते. तसेच प्रत्येक पात्राची, व्यक्तिविशिष्टताही साकार करते. त्यांचे परस्परांशी 'बोलणे' (संवाद) हेच घटना म्हणून सामोरे येते. त्यांचे संवाद 'लिव्ह इन रिलेशनशिप' व एकूणच जागतिकीकरणाच्या एकूणच मानवी पर्वात समाजातील सर्व घटितांना प्राप्त झालेल्या 'आवाजामुळे' उघडपणे अस्तित्वात आलेले समलिंगी संबंध ह्या जगण्याच्या नव्या पद्धतीविषयी चर्चात्मक घटनांची निर्मिती करतात. 'संवादां'ना घटनेचे स्वरूप देणे हे ह्या प्रकारच्या प्रवेशांमधून घडते, ते नाट्यपूर्ण ठरते. तसेच प्रस्थापित व्यवस्थेसमोर विचारमंथनाचे आवाहन उभे करते. हे संवाद नाट्यघटनांचे कलात्मक व सौंदर्यात्म वैशिष्ट्य ठरते.

प्रस्तुत नाटकातील दोन प्रवेश हे रुढार्थाने ज्याला घडणे असे म्हणतो त्या प्रकारे साकारतात. उदा. नाटकभर रंगमंचाबाहेर असलेले कुमुदिनी हे पात्र स्त्रीवादाविषयी व स्त्रीचळवळीविषयी जी जाहीर विधाने करते. त्या विधानांबाबत मुलगी म्हणून उत्तराला काय वाटते हे जाणून घेण्यासाठी आलेले यशोदा हे पात्र व उत्तरा ह्या दोघांमध्ये जे संवाद घडतात ते संवाद घटनेची निर्मिती करतात, तसेच यशोदा व उत्तरा रंगमंचाबाहेर गेल्यानंतर कार्तिक व व्योम या दोन पात्रांमध्ये जे संवाद होतात त्या संवादप्रसंगीही घटनेची निर्मिती होते. वादप्रतिवाद, क्रिया-प्रतिक्रिया असे स्वरूप या घटनांचे राहाते आणि त्यातून 'गे' असलेल्या व्यक्तीचे व पारंपारिक विवाहबंधन नाकारून एका स्त्रीबरोबर राहण्याचा 'आधुनिक' विचार करणाऱ्या व्यक्तीची स्त्री-विषयक व स्त्रीवादाविषयी कोणती भूमिका आहे, ते स्पष्ट केले जाते. स्वत:ला स्त्रीवादी म्हणवून घेणाऱ्या स्त्रिया त्यांच्याही नकळत आपल्या विचारांची पुनर्तपासणी नाकारत आहेत. त्या आपल्या भूमिकांवर स्त्रियांकडूनच होणाऱ्या टिकेविषयी असहिष्णू होत आहेत. एकीकडे स्त्रीवादी चळवळीविषयी स्पष्टवक्तेपणाची निकड आहे, त्याच वेळेला अनेक स्त्रिया पुरुषसत्ताक व्यवस्थेने निर्माण केलेले स्त्रियांचे प्रश्न प्रामाणिकपणे सोडवित आहेत. त्यामुळे तळागाळयातल्या सर्वस्तरीय शोषणात अडकलेल्या स्त्रियांना किमान मदत मिळत आहे. त्यामुळे जनजागरण होत आहे,  असे परस्परविरोधी जीवनसंदर्भ उपरोक्त घटनेतून अधोरेखित होत विशिष्ट चळवळीकडे पाहाण्याचा विशिष्ट वर्गातील स्त्री-पुरुषांचा विशिष्ट दृष्टिकोन साकार होतो. हेही ह्या घटनेचे नाट्यात्म कार्य असल्याचे म्हणता येते. उत्तरा व्यवसायाने नट म्हणून कार्यरत आहे. एका सिनेमात मोलकरणीची भूमिका (चंदा) तिला करायची आहे. ती सुखवस्तू कुटुंबातून आलेली असल्याने तिला मोलकरणीची भूमिका करणे 'नट' म्हणून आव्हान वाटते. ही भूमिका आपल्याकडून उत्तमरीत्या पार पाडावी म्हणून ती आपल्याच घरात 'चंदा' (मोलकरीण) होऊन वागू लागते, असा एक प्रसंग अभिनीत होतो. हा प्रसंग नाट्यात्मता निर्माण करतो. पात्राची दुहेरी भूमिका नाट्य निर्माण करते. त्यामुळे रंगमंचावर नाट्यपूर्ण घटनेची निर्मिती होते.

उत्तराच्या आईने स्त्रीवादी चळवळीविषयी केलेल्या वादग्रस्त विधानांवर एक सेलिब्रेटी म्हणून व उत्तरा ह्या चळवळीशी संबंधित आहे म्हणून तिचे मत जाणून घेण्यासाठी यशोदा आली असताना उत्तरा जी सारवासारवीची उत्तरे देते, ती ऐकून कार्तिक तिच्याशी वाद घालतो. तिचे वागणे त्याला 'खोटेपणा'चे, 'मुखवट्या'चे वाटत असल्याचे तो तिला स्पष्टपणे सांगतो असा प्रसंग अभिनीत होतो. हा प्रसंगही 'लिव्ह इन रिलेशनशिप' स्त्रीपुरुष संबंध,

स्त्रीपुरुषाच्या मनातील मानवी नात्याविषयीच्या भावभावना आदींवर भाष्य करतो. त्यामुळे प्रस्तुत प्रसंग कार्तिक ह्या पात्राच्या मनातील दबलेले विचार स्फोटकपणे प्रकट करतो. एकूण पात्रपात्रसंबंधांवर व पात्रमनावर प्रकाश टाकण्याचे कार्य, हा नाट्यपूर्ण प्रसंग करतो असे म्हणता येईल. एकंदरीत, प्रस्तुत नाटकातील घटनांचे वर्गीकरण संवाद हीच घटना व संवादांतून घटनांची निर्मिती असे करता येते, असे म्हणता येईल.

समलिंगी संबंधातही पुरुषतत्त्व स्त्रीतत्त्वाला आपल्या विचार वर्तन प्रभावाखाली आणते आणि ह्या संबंधातील स्त्रीतत्त्व संघर्ष नको म्हणून पुरुषतत्त्वाचा प्रभाव स्वीकारते अशी घटना नाटककाराने कल्पिलेली आहे. स्त्रीवादी चळवळीमुळे उदयास आलेल्या 'लिव्ह इन रिलेशनशिप'चा स्वीकार करून जगणाऱ्या उत्तराने समाजरचित स्त्रीत्वाला नकार दिला आहे. तसेच तिने स्त्रीविशिष्ट अनुभवांना (गरोदरपण, बाळंतपण) आणि पुरुषतत्त्वातील दबावतंत्राला ठाम नकार दिला आहे, असे कल्पिले आहे. ह्या परस्परविरोधी कल्पनांमुळे नाटककार स्त्रीवादी चळवळीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहात नसल्याचे म्हणता येते. तसेच स्त्रीतत्त्वाने पुरुषतत्त्वाचा प्रभाव, दबावतंत्र स्वीकारले तर स्त्री-पुरुषामधील संघर्षजन्य परिस्थिती व संघर्ष टाळणे शक्य होईल, असे सुचवावयाचे आहे की काय? असा प्रश्न उपस्थित करता येईल.

दुसरीकडे विवाहित पुरुषाचा आपल्याला अपत्य हवेच असा आग्रह नसतो. मात्र स्त्री अपत्य प्राप्तीसाठी आसुसलेली असते. मातृत्व हा भाव स्त्रीठायी जणू जन्मत: असतो. असे जे अ-सामाजिक संकेत रूढ झालेले आहेत, त्या संकेतांना नाट्यगत पात्रे नकार देताना दिसतात. उदा. कार्तिकला म्हणजे पुरुष पात्राला आपल्याला मूल हवे असे वाटते, तर अपत्य असण्याची ही गरज स्त्री-पात्राच्या मनोविश्वाला स्पर्शही करीत नाही. असे कल्पून नाटककार स्त्रीवादी भूमिकेचाच उच्चार करतो, असे म्हणता येईल. भारतीय समाजात एका विशिष्ट समाजाने विशेषत: उच्चभ्रू वर्गाने अवलंबिलेली 'लिव्ह इन रिलेशनशिप' ही संकल्पना व त्याचे प्रात्यक्षिक स्वीकारते; पण समलिंगी संबंध स्वीकारू शकत नाही, असे कल्पून समलिंगी पात्रे जन्माने भारतीय वंशाची असूनही ती पाश्चिमात्य देशांमध्ये स्थायिक झाल्याचे दाखवितो. तसेच 'गे' चा 'विवाह' ही संकल्पना अमेरिकेतील सॅनफ्रॅन्सिस्कोमध्ये कायदेशीररीत्या स्वीकारली गेल्याचे कल्पितो. त्यामुळे समाजात अस्तित्वात असलेल्या व समाजाचा अपरिहार्य भाग असलेल्या समलिंगी व्यक्तीकडे पाहाण्याची भारतीय समाजाची दृष्टीही अधोरेखित होते. ह्या पार्श्वभूमीवर सायरस आणि व्योम ह्या पात्रांचा विचार करणे शक्य आहे.

'छोट्याश्या सुट्टीत' ह्या नाटकात उत्तरा, कार्तिक, सायरस, व्योम ही महत्त्वाची पात्रे असून उत्तराची आई कुमुदिनीताई स्त्रीवादी चळवळीत कार्य करणारी यशोदा ही पात्रे ही वैशिष्ट्यपूर्ण असून ती नाट्यकथानकास गतिमान करण्यास पूरक ठरतात.

उत्तरा व कार्तिक ही पात्रे उत्तर आधुनिक काळात उदित झालेल्या 'लिव्ह इन रिलेशनशिपचा' स्वीकार करून स्वतंत्रपणे राहात आहेत. तर सायरस व व्योम ही पात्रे समलिंगी संबंधामुळे एकत्र आली आहेत. उत्तरा व सायरस हे बालपणापासूनचे मित्र असून विशिष्ट कारणाने ते एकमेकांना खूप वर्षांनंतर भेटले आहेत. त्यामुळे उत्तराचे घर ह्या स्थलावकाशात ही चार पात्रे एकत्र आली आहेत.

उत्तरा आधुनिक विचारांच्या प्रभावाखाली लहानाची मोठी झालेली आहे. स्वतंत्रपणे विचार करणे, प्राप्त परिस्थितीमध्ये आपला आपण निर्णय घेणे, स्वत:ला घडविणे इत्यादी बाबींविषयाचा विचार तिच्या आईकडून

तिच्याकडे झिरपला आहे. संपूर्ण नाटकात उत्तराच्या वडिलांचा अवघ्या एका वाक्यात उल्लेख आलेला आहे. (पृ.१८) त्यावरून त्यांनीही तिला स्वत:च्या मनाप्रमाणे जगण्याची सूचना केल्याचे कळते. अशा संस्कारात उत्तरा वाढल्यामुळे ती कार्तिकबरोबर 'लिव्ह इन् रिलेशनशिप'मध्ये राहाते. तिला एक नट म्हणून करिअर करायचे आहे आणि त्याचबरोबर स्त्रीवादी विचारसरणीचा प्रचार, प्रसार करणाऱ्या स्त्रीसमूहासोबत तिला राहायचे आहे. ज्या प्रकारचा विचार उत्तरा करते आणि जे धैर्य तिच्यासमोर आहे; त्याचा विचार करता, तिच्या एकूण व्यक्तित्वात स्व-केंद्रितत्व ठळकपणे मुरलेले दिसते. स्त्रीचे स्वातंत्र्य, तिचे विचार, महत्त्वाचे आहेत असे मानणारी ती लग्नव्यवस्थेलाही नकार देते. मात्र 'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये कार्तिकसोबत राहाताना कार्तिककडून भावनिक आधाराची गरज वेळोवेळी व्यक्त करते. याचा अर्थ मानवी नातेसंबंधामध्ये असलेले भाववाहित्व ती नाकारत नाही. मात्र 'नवरा-बायको, आजी-आजोबा आणि ढीगभर आरडाओरडा करणारी मुले (पृ. ४०) जेथे नसतील, तेथे जेवायला जाण्याचा' विचार ती व्यक्त करते. तेव्हा तिचा कुटुंबसंस्थेला विरोध असावा असे वाटते. महाविद्यालयीन जीवनात स्त्रीवादी चळवळीशी जोडली गेलेली उत्तरा त्या चळवळीच्या विचारगाभ्यापर्यंत पोहोचलेली दिसत नाही. त्यामुळे स्त्री, स्त्रीचे स्वातंत्र्य, तिचे भावविश्व ह्या विषयी ती अतिशय संकुचित विचार करताना दिसते.

सर्वसाधारणपणे मुलींनी ड्रिंक घेणे, पबमध्ये नाचणे, स्त्रीने मूल जन्माला न घालणे ह्या तिच्या आधुनिकतेविषयीच्या कल्पना आहेत. ह्या कल्पनांमुळे ती मुक्तपणे जगते. परंतु स्त्रीवादासंदर्भात आणि स्त्रीवादी चळवळीसंदर्भात ठाम भूमिका घेण्याची वेळ येते तेव्हा ती कातडी बचावू भूमिका घेताना दिसते. तिचे हे वर्तन दुटप्पीपणाचे ठरते असे वाटते. बदलत्या सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेत स्त्री अथवा पुरुष ह्या दोघांनाही 'स्वत: मूल जन्माला न घालता मूल दत्तक घेऊन 'सिंगल पेरेंट' होण्याची संधी प्राप्त झाली पाहिजे' असे तिला वाटते. कार्तिकला मूल हवे होते आणि आपण ते होऊ दिले नाही, कारण बरोबरीच्या पुरुषासाठी स्वत:ला मूल होऊ देणे म्हणजे 'कुटुंब' जन्माला घालणे होय, हे तिला ज्ञात आहे. मात्र वर म्हटल्याप्रमाणे पालक होण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले पाहिजे, असा आपला हक्क मानून ती एक मूल (मुलगा) दत्तक घेते आणि ते मूल कार्तिकला देते. ह्या साऱ्या तिच्या उक्तिकृती तिच्या व्यक्तित्वाचे विविध पैलू उघडकीस आणतात.

जागतिकीकरणानंतर समाजात जे प्रश्न निर्माण झाले ते 'सामाजिक' होते. त्यामुळे त्या प्रश्नांचा उच्चार आणि त्यानुसार उक्तिकृती करण्याची संधी याच काळात जगभर प्राप्त झाली याचा प्रत्यय उत्तरा कार्तिक, सायरस, व्योम यांच्यासमोर असलेल्या प्रश्नांमुळे येतो असे म्हणता येईल.

कार्तिक हे उत्तराइतकेच महत्त्वाचे असलेले पात्र आहे. स्त्रीवादी विचारसरणीतून उदयाला आलेल्या 'लिव्ह इन रिलेशनशिप' ह्या संकल्पनेचा त्याने स्वीकार केलेला आहे. व्यवसायाने तो 'शेफ' असून मोठमोठ्या व्यापारी बोटींवर तो काम करतो. त्यामुळे त्यालादोन-दोन, तीन-तीन महिने अटळपणे घराबाहेर राहावे लागते. 'लिव्ह इन रिलेशनशिप' स्वीकारण्यामागे त्याच्या नोकरीचे स्वरूप हे एक कारण असल्याचे नाकारता येत नाही. पारंपरिक विवाहबंधनात आणि कुटुंबबंधनात प्राप्त होणाऱ्या अनुक्रमे, पती, बाप ह्या नात्यांची जी जबाबदारी असते ती जबाबदारी पार पाडणे कार्तिकलाही शक्य नाही असे दिसते. एका टप्प्यावर त्याला आपण बाप व्हावे असे वाटत असले तरी अनुषंगिकपणे येणाऱ्या जबाबदाऱ्यांची त्याला पूर्ण कल्पना आहे आणि त्या स्वीकारण्याची त्याची मानसिकताही आहे असे नाटकात तरी आढळत नाही. स्वतंत्र विचारांची पत्नी हे एक आकर्षण त्याला असले आणि घरातही चहा-कॉफी व स्वयंपाक करण्यात त्याला रस असला तरी स्त्रीकडे बघण्याची त्याची दृष्टी ही वैचारिक

Research Hub International Journal

पातळीवर पुरोगामी आहे असे म्हणणे धिटाईचे ठरेल. कारण प्रसंगपरत्वे स्त्रीवादी भूमिकेविषयी, चळवळीविषयी मतप्रदर्शन करण्याची वेळ येते तेव्हा तो 'हे फारच बरं होतं... हे काहीच नाही. पण टेररिझमच आहे. बरोबर आहे तुझं हल्ली बायकांविषयी काहीही बोलणं सोपं उरलेले नाही. (पृ.६०).....'कुणी सांगितलं तुला, मला... मला मुलं नको आहेत म्हणून? तू ते ॲझ्यूम करून टाकलंस... छापलंस. मी माझ्या स्वभावाप्रमाणे गप्प बसलो. मूल होण्याची इच्छा असणं... त्याची जोडीदाराकडे मागणी करणं, ह्यात काहीतरी सामाजिक कमीपणा आहे असं तुला वाटत असणार, त्या चळवळीवाल्यांची दहशत ती हीच ! सगळ्यांनी सपाट एक सारखं जगायचं. नव्या जाती निर्माण करून बसताय तुम्ही... स्त्री-विचारवाले होमोसेक्युअल्स, दलित, पुरोगामी नव्या इंटलेक्चुअल जाती !... हक्क, अधिकार, कायदे, दडपण, लग्न केलेले-न केलेले... कुणी कशाला असल्या गोष्टींच्या टिमक्या वाजवायच्या ! (पृ.६३, ६४) अशा प्रतिक्रिया व्यक्त करतो. याचा अर्थ पारंपरिक कुटुंबव्यवस्थेत स्त्रीला मूल हवे की नको ह्यापेक्षा पुरुषाला अथवा कुटुंबाला हवे आहे म्हणून मूल जन्मास घालणे विवाहित स्त्रीला बंधनकारक राहाते. आणि त्यात विशेष काही नाही अशी त्याची भूमिका असल्याचा संशय त्याच्या वरील मतांवरून घेता येतो. तो उत्तराप्रमाणे दांभिक नाही. मानवी संबंधातला हळुवारपणा त्याला हवाहवासा वाटतो आणि तसा कबुलीजबाबही तो देतो. त्याच्या ह्याच स्वभावामुळे 'गे' संबंधांमध्ये स्त्रीत्वाचा अनुभव घेणाऱ्या व्योमविषयी त्याला आपलेपणा वाटतो आणि त्याच्याशी भावनिक पातळीवर स्वत:ला जोडूनही घेतो. संपूर्ण नाटकात कार्तिक आणि व्योम् ही पात्रेच परस्परांच्या भावभावना एकमेकांसोबत वाटून घेताना दिसतात. उदाहरणार्थ कार्तिक व्योमच्या केसांना तेल लावून देणे; व्योमची विमानप्रवासात हरवलेली बॅग आणण्यासाठी त्याच्या सोबत जाणे; व्योमची आणि सायरसची ओळख कशी झाली हे जाणून घेणे; त्याची बॅग हरवली असताना त्याला कपडे देणे इत्यादी. नाटकात अखेरीअखेरीस कार्तिकचे दीर्घ निवेदन येते. ह्या निवेदनात घडून गेलेल्या काही घटनांची उजळणी येते. ह्या उजळणीत उत्तराने सिंगल पेरेंट होऊन आपल्यासाठी मूल दत्तक घेतले ह्या विषयीची कृतज्ञता तो व्यक्त करतो. तसेच त्या बाळाचे नाव व्योम असे ठेवून व्योमला त्याच्या अंत:करणात किती खोलवर स्थान आहे हेच दाखवून देतो.

सायरस आणि व्योम ही समलिंगी संबंधातील दोन महत्त्वाची पात्रे आहेत. सायरस आणि व्योम दोघेही भारतीय वंशाचेच आहेत पण कारणपरत्वे ते परदेशात स्थायिक झालेले आहेत. सायरस आणि उत्तरा बालपणीचे मित्र आहेत. ई-मेलद्वारा ते एकमेकांच्या संपर्कात आहेत. सायरसमधील पुरुषतत्त्व प्रभावी असून पुरुषात असलेल्या स्त्रीतत्त्वाचे त्याला आकर्षण आहे. दोन पुरुषांची मैत्री एवढ्यावर तो समाधानी राहायला तयार नाही. 'गे' संबंधांमध्येही त्याला विवाह आवश्यक वाटतो कारण त्याला सतत असुरक्षित वाटते. ह्याचा अर्थ सायरस 'लग्न' ह्या संस्थेकडे पारंपरिक दृष्टिकोनातून पाहत आहे असे दिसते. विशेष म्हणजे स्त्रीतत्त्व प्रभावी असलेल्या व्योमकडे पाहाण्याचा त्याचा दृष्टिकोनही पारंपरिकच आहे. उदाहरणार्थ, उत्तरा, कार्तिक यांच्याशी बोलताना तो त्या बोलण्यात व्योमला सहभागीकरून घेत नाही; विमान प्रवासात व्योमची बॅग हरवली असताना निर्माण झालेल्या परिस्थितीतही तो आपले कपडेही व्योमला वापरायला द्यायला तयार होत नाही; मुंबईतील पिढीजात प्रॉपर्टीचे कामकाज पाहण्यासाठी तो एकटाच जातो; तसेच लग्नाच्या संदर्भातील सरकारी बाबी पूर्ण करण्यासाठी तो एकटाच दिल्लीला जातो. इत्यादी.

लग्न दोघांचे असूनही पारंपरिक लग्नव्यवस्थेत पुरुष केंद्रस्थानी असतो आणि स्त्री दुय्यमस्थानी असते. तसेच सायरस व्योमच्या संदर्भात वागताना दिसतो.

ह्याउलट आपल्या ठायीच्या स्त्रीतत्त्वाचा प्रभावी अनुभव घेणाऱ्या व्योमला केवळ तो 'गे' आहे म्हणून कुटुंबापासून अलग व्हावे लागते. तसेच सायरसला केवळ 'गे'शीच मैत्री आवडते म्हणून इतर मित्रांशी असलेली मैत्री त्याला तोडावी लागते. त्याविषयीची तक्रार त्याने बोलण्याच्या ओघात कार्तिकजवळ व्यक्त केलेली असली तरी सायरसबरोबर असलेले संबंध तोडून टाकण्यास त्याला रस असलेला दिसत नाही. पुरुषसत्ताक व्यवस्थेत होणाऱ्या विशिष्ट संस्कारामुळे स्त्रिया ज्याप्रमाणे पदरी पडलेला पुरुष सोडून देण्याची संमती दर्शवित नाही तसेच स्त्रीतत्त्व प्रभावी असलेला व्योम वागताना दिसतो. नाटकात ह्याउलट उत्तराचे वागणे बोलणे आहे. ह्या पार्श्वभूमीवर नाटककार स्त्रीच्या ठायी सहनशीलता, त्याग हे समाजरचित गुणधर्म निसर्गत: असतात असे कल्पित असावा असे वाटते.

रंगमंचावर एकदाही न आलेले पण पात्र-पात्रसंवादात ज्या पात्राचा अनेकदा उल्लेख येतो ते पात्र म्हणजे उत्तराची आई कुमुदिनीबाई होय. हे पात्र वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ असून आपल्या विचारांशी प्रामाणिक आहे. ह्या पात्रास स्त्रीवादी विचारसरणी मान्य असली तरी केवळ स्त्रियांनी स्त्रियांचा विचार करावा, शतकानुशतके चालत आलेल्या समाजबंधनातून स्त्रीला मुक्त करण्यासाठी केवळ स्त्रियांनी झगडावे हे ह्या पात्रास मान्य नाही. म्हणूनच स्त्रीविषयक प्रश्नांची तात्त्विक आणि व्यावहारिक बाजू मासिकांमधून स्पष्ट करणार्या चळवळींविषयी हे पात्र अनुद्गार काढते. आपल्या मुलीने (उत्तराने) लग्नात न अडकता वेगळ्या पद्धतीने जगावे आणि आपला प्रगल्भ विकास करून घ्यावा असे ह्या पात्रास आरंभी वाटत असते. पण बहुधा उत्तराचे व्यक्तिमत्त्व अशा प्रकारचे नाही हे ओळखून तिने विवाह करावा असा सल्लाही ती मुलीला देते. याचा अर्थ कुमुदिनीबाई हे पात्र परस्परविरोधी विचार करत नसून परिस्थितीनुसार विचार करीत आहे असे म्हणावे लागेल.

प्रस्तुत नाटकात नलिनी आणि यशोदा ही दोन पात्रे स्त्रीचळवळीशी निगडित असलेली पात्रे आहेत. यशोदा ह्या पात्राची स्त्रीवादी चळवळीविषयीची भूमिका ठाम आहे. ह्या भूमिकेत बदल करण्यास ती तयार होण्याची मुळीच शक्यता नाही, आणि म्हणूनच 'बायका म्हणजे काय डायनॉसॉर्स आहेत, की त्यांचा स्वतंत्र आणि खास अभ्यास करायला?... सहजीवन विशेषांक कसले काढता? दोन टाळकी एकत्र आली की सगळ्यांचं सहजीवन इथून तिथून सारखंच असतं. त्यापेक्षा जीवनाचे अंक काढा जीवनाचे. माणसांना वेगवेगळं काढून तपासा मग फार कमी माणस झळझळीत उतरतात.... पहिल्यांदा बायाबायांचे कंपू करून बेट धरून बसला आहात, ते मोडा आणि समाजात मिसळा'. (पृष्ठे ५६,५७) कुमुदिनीताई ह्या पात्राच्या परखड मतांचा उत्तराची मैत्रीण यशोदा विपर्यास करताना दिसते. कुमुदिनी हे पात्र वैशिष्ट्यपूर्ण घटनानिर्मितीस, नाट्यकथानकास गतिमान करण्यास व विशिष्ट पात्राचा (उत्तरा) दांभिकपणा व्यक्त करण्यास कारणीभूत ठरते. ह्या पात्राचे हे नाट्यात्म कार्य उल्लेखनीयच म्हणायला हवे.

वस्तुत: प्रस्तुत नाटकात पात्रचित्रणावर विशेष भर असलेला आढळत नाही. पात्रांचे भावविचार अतिशय मर्यादित अशा मानवी संबंधांमध्ये अडकलेले आहेत. एकूण मानवी समाज आणि त्या मानवी समाजातील व्यक्तीचे स्थान ह्याचा व्यापक विचार ह्या नाटकातील कोणतेही पात्र करताना दिसत नाही. ही पात्रे आपापल्या प्रश्नात आपापल्या व्यक्तित्वात गुंतून पडलेली आहेत. त्यांच्या विचारविश्वाला त्याच्या व्यक्तिमत्वाचा त्यांच्या समाजधारणेचा मर्यादा पडलेल्या दिसतात.

कोणत्याही नाटकात 'संवाद' हा अतिशय महत्त्वाचा घटक असतो. पात्र-पात्रसंवादांतून कधी नाट्य घटनांची

Research Hub International Journal

निर्मिती होते. तर संवाद कधी पात्रमनावर प्रकाश टाकतात तर कधी पात्रांचे स्वभावाविशेष साकारतात. 'छोट्याश्या सुट्टीत' ह्या नाटकातील संवादही ह्या प्रकारचे कार्य करताना दिसतात. त्याकडे वळण्यापूर्वी प्रस्तुत नाटकातील संवादांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आरंभीच नोंदवायला हवे ते असे, प्रसुत नाटकातील उत्तरा-कार्तिक, कार्तिकव्योम ह्या पात्रांमधील संवाद हेच घटना होऊन साकारतात ह्या पात्रांच्या संवादप्रसंगी बदलत्या काळातील वेगवेगळ्या प्रश्नांची चर्चाच प्रामुख्याने सामोरी आणली जाते.

काही संवाद हे अपरिचित पात्रांमध्ये निर्माण झालेल्या नव्या नात्याचा, त्यांच्यातील मैत्रभावाचा निर्देश करतात. उदाहरणार्थ कार्तिक व व्योम ही पात्रे वास्तविक एकमेकांना ओळखत नाहीत, पण विशिष्ट कारणांनी ही एकमेकांसमोर येतात. तेव्हा ती जे बोलतात त्यातून वर नोंदविलेल्या बाबी प्रकट होतात. विशेष म्हणजे या नात्याला एक नवा अर्थ प्राप्त होतो तो कार्तिकने उत्तराने (सिंगल पेरेंट) म्हणून दत्तक घेतलेल्या बाळाचे नाव व्योम ठेवणे ह्या घटनेत होय. कार्तिकमध्ये आपल्याला आई आणि बाबा दोन्ही वाटतात. अर्थाचा नाटकाच्या अखेरीस येणारा व्योमचा संवाद कार्तिकच्या उपरोक्त कृतीला नवा अर्थ प्राप्त करून देतो.

कार्तिक : काय रे... काय करतोयस ?

व्योम : तेल लावतोय डोक्याला.

कार्तिक : हातांत ग्लोव्हज घालून?

व्योम : म्हणजे हात खराब होत नाहीत. मला तेलकट हात अजिबात आवडत नाहीत. तेलकट

होतील ना हात. (त्याच्या हातातून तेलाची वाटी घेतो.) हातावर तेल घेऊन ते व्योमच्या डोक्यावर लावतो)

व्योम : आऽऽऽहळू...

कार्तिक : गप... ही काय तेल लावयची पद्धत झाली? ग्लोव्हज घालून ?

व्योम : (काही वेळाने) उत्तरा कालपासून काहीच बोलत नव्हती तुझ्याशी... रात्री पबमध्ये सुद्धा मला वाटलं तुम्हांला जबरदस्ती करून बाहेर खेचलं आम्ही.

कार्तिक : सोडून दे असंच आम्ही मध्ये मध्ये एकमेकांवर रिॲक्ट होत असतो. दुसरं कुणी नसतं ना आजूबाजूला चिडायला.

व्योम : आमचं पण असंच होईल ?

कार्तिक : कसं ?

व्योम : असं... भांडाभांडी... चिडाचिडी ?

कार्तिक : बापरे... तुमचं तर काही खरं नाही. अजूनच भयंकर...

व्योम : का ?

कार्तिक : लग्न करताय ना तुम्ही ? म्हणून

व्योम : मला तर काहीही चालेल लग्न केलं काय, नाही केलं काय सायरस म्हणतोय म्हणून मी आपलं हो म्हटलं. नाहीतर तो फार विचित्र रिॲक्ट करतो.

कार्तिक : म्हणजे काय करतो ?

व्योम : म्हणजे चिडतो. काही बाबतीत त्याच्या फार ठाम कल्पना आहेत. म्हणजे त्याला असं वाटतं, की सगळे स्ट्रेट लोक... म्हणजे हेटरोसेक्युअल्स त्याच्यावर अन्याय करतात. पण असं नसतं. तुला सांगू. त्याला एकही स्ट्रेट मित्र नाहीये. सतत गे ॲक्टिव्हिस्ट लोकांमध्ये असतो. तो गेल्या पाच वर्षात माझेही सगळे मित्र हळूहळू तुटत गेलेत. म्हणजे मला जपून भेटावं लागतं त्यांना.

कार्तिक : एकटेपणा वाटत नसेल त्या सगळ्यांच्यात राहिल्याने. बरं असेल नाही का या सगळ्यांचं मी काही बाई नाही, दलित नाही. होमोसेक्युअल नाही, की काही नाही.

व्योम : (हसत) तू डावरा आहेस का ? डावरा लेफ्टी ? लेफ्टी लोकांची पण असोसिएशन असते. आहे तिकडे टोरांटोला.

कार्तिक : हो आमच्याकडे पुण्यात पण आहे. पण नाही... मी लेफ्टी पण नाही.

व्योम : बिच्चारा, मग तू बिच्चारा आहेस.

कार्तिक : सहा वर्षापूर्वी माझी नि उत्तराची ओळख झाली. तेव्हा ती पूर्णपणे स्त्रीवादी चळवळीत होती. तिचे असे खूप पटापटा बदलणारे, पण पॅशनेट इंटरेस्ट असतात. पण तेव्हा ती अशी तक्रारी नव्हती. कॉलेज करून, त्यांच्या मासिकाचं काम करून, वर नाटकांत वगैरे कामं करायची. तिच्या आईचा खूप प्रभाव होता तिच्यावर. फार सेन्सिबल बाई आहेत त्या. स्वत:च्या कामांची, अनुभवांची कसलीही जबाबदारी दुसऱ्यांवर न टाकणाऱ्या त्यांनीच हिला स्वत:पासून दूर केली, त्यांना हिने पूर्ण स्वतंत्र व्हायला हवं होतं. ते चुकलाच असं वाटतं मला. आता उत्तराचं काय ! पण त्या सगळ्या सो कॉल्ड चळवळवाल्या स्वतंत्र आहेत का? हा प्रश्नच पडतो मला. ज्याचा आनंद आणि शांतता ही दुसर्यांनी त्यांच्याशी कसं वागायचं यावर अवलंबून असेल, तर ह्या कसल्या स्वतंत्र्य!

व्योम : कसं आपण भसाभसा बोलून घेतोय ना..ती दोघं बाहेर गेलीत त्यामुळे

कार्तिक : छे मी सगळं उत्तरासमोर बोलू शकतो. तिला माहितीये. म्हणून तर आमची भांडणं होतात ना!

व्योम : मी सायरशी असलं बोलूच शकणार नाही. तो मला सारखं म्हणतो... बेबी यू आर टू यंग!

कार्तिक : आणि उत्तरा मला म्हणते... शेवटी तू पुरुषच!

व्योम : पण सायरस चांगला आहे माझा.

कार्तिक : उत्तरापण !" (पृष्ठे ४१, ४२,४३)

Research Hub International Journal

आरंभी म्हटल्याप्रमाणे प्रस्तुत नाटकातील अनेक संवाद हे पात्रमनावर व पात्रस्वभावावर प्रकाश टाकणारे आहेत.

**उदाहरणार्थ,**

यशोदा : उत्तरा, त्या म्हणाल्या, बायका म्हणजे काय डायनॉसॉर्स आहेत, की त्यांचा स्वतंत्र आणि खास अभ्यास करायला? ती आमची तरुण मैत्रीण, मोनिका बंबवाले नाव तिचं... घाबरली ती. हे काय बोलणं झालं? म्हणजे सगळ्या गेल्या वर्षांच्या चळवळीवर पाणीच फिरलं ग ! आम्ही सगळ्याजणी आपल्या करतोय काम, तो मूर्खपणाच म्हणायचा !'

यशोदा : एवढ बोलून त्या थांबल्या नाहीत. पुढे म्हणाल्या सहजीवन विशेषांक कसे काढता? दोन टाळकी एकत्र आली की सगळ्याचं सहजीवन इथून-तिथून सारखंच असतं. त्यापेक्षा जीवनाचे अंक काढा जीवनाचे माणसांना वेगवेगळं काढून तपासा. मग फार कमी माणसं झळझळीत असतात आणि पुढे असंही म्हणाल्या, की पहिल्यांदा बायाबायांचे कंपू करून बेटं धरून बसला आहात, ती मोडा आणि समाजात मिसळा.( पृ. ५७)

उत्तराः (विचार करून) कुमुदिनी वागळे यांच्या विधानाबद्दल मी असं म्हणेन, की जरी मत व्यक्त करण्याचं पूर्ण स्वातंत्र्य त्यांना असलं, तरी स्त्रीवादी चळवळीचा फेस असलेल्या ह्या महत्त्वाच्या मासिकांच्या मागे काहीतरी विचार असेलच की ! सहजीवनाची स्त्रीच्या मनातली प्रतिमा ही खास आणि सुंदर असते. त्याला भावनेचे पदर असतात. संस्कृती आणि जीवनाचे पदर असतात. त्यामुळे स्त्रीच्या दृष्टिकोनातून स्त्री-पुरुष सहजीवनाचा अभ्यास करणं महत्त्वाचं आहे.(पृ. ५८)

कार्तिक : ऑस्ट्रेलियाहून चार महिन्यांनंतर मी परत आलो, तेव्हा मला लक्षात आलं, की ती सुट्टी आमचं सगळं आयुष्य बदलवून टाकणारी ठरली. ठरवल्याप्रमाणे सायरस आणि व्योमचं लग्न झालं. मला व्योमचा भांबावलेला, तरीपण हसत राहाणारा चेहरा दिसत होता त्या दिवसभर. मी वेळ काढून डेकवरून समोरच्या सूर्याकडे पाहात त्यांना फोन केला. मग काय वाटलं कुणास ठाऊक. उत्तरालाही केला. मग शाळेतले दोन मित्र आहेत माझे, त्यांना केला ! आणि पुण्याला आईशीसुद्धा बोललो. मग बरं वाटलं. मी मुंबईला परत आलो, तेव्हा उत्तराने समोरच्याच बिल्डिंगमध्ये फ्लॅट घेऊन ठेवला होता. कधी शूटिंग्जच्या धावपळीतून, दमणुकीतून तिला वेळ मिळाला, तर सकाळचा निवांत चहा घेत गप्पा मारायला ती यायला लागली. गेल्या काही वर्षांमध्ये तिने खूप कष्ट केले, कॉम्प्रमाइज न करता उत्तम भूमिका केल्या आणि तिला हव्या त्या पद्धतीने ती छान जगत राहिली. सायरसशी खूप जोरात भांडण झालंय अशी व्योमकडून एकदा मेल आली. मग पुन्हा एकदा तशीच. मग आणखी एकदा तशीच ! मग ते दोघेही एकमेकांत रुळले आणि आता मजेत राहातायत. त्यांच्या घरी मात्र मी कधी गेलोच नाही. त्या व्योमला गेल्या कितीतरी वर्षात भेटलोच नाही. गेल्या वर्षीच उत्तराने सिंगल पेरेंट म्हणून कायदेशीररीत्या एक छोटा-गोड मुलगा दत्तक घेतला. त्याला पहिल्यावर एकदम रडायला येईल की काय, असं वाटल मला. माझ्या वाढदिवसाच्या दिवशी ती सकाळी घरी आली आणि माझ्या मांडीवर तिने ते छोटं बाळ ठेवलं त्याचं नाव ठेवताना ती माझ्याशी अजिबात भांडली नाही. त्या बाळाला मांडीवर घेतलं, तेव्हा मी म्हणालो - याचं नाव 'व्योम'! (पृष्ठे ६७,६८)

कुमुदिनी वागळे ह्यांच्या विचारांतील सडेतोडपणा प्रेक्षकांना सामोरा येतो. तर उत्तराच्या उपरोक्त संवादातून

तिची दांभिकवृत्ती प्रकट होते. आणि कार्तिकच्या संवादांतून त्याचे माणसांमध्ये गुंतणे, व्यक्तीकडे प्रसंगावशात निरलसपणे पाहाणे हे गुणविशेष व्यक्त होतात. यशोदाचा संवाद रंगमंचीय अवकाशात उत्तरा ह्या पात्राच्या उपस्थितीत व्यक्त होत असला तरी तो मूळचा कुमुदिनी ह्या पात्राचा असल्याने त्याचे स्वरूप कथनपर होते.

'गे रिलेशनशिप' व 'लिव्ह इन रिलेशन शीप' ह्या दुहेरी सूत्रांभोवती 'छोट्याशा सुट्टीत' ह्या नाटकाचा विषय गुंफलेला असल्यामुळे नाटकाची भाषा ह्या दोन प्रकारच्या रिलेशनशिपला आणि त्या रिलेशनशीपमधील ताणाबाणांना सहजपणे आविष्कृत करते.

**उदाहरणार्थ,**

खूप वर्षांनंतर सायरस परदेशातून उत्तराकडे येणार असल्याची मेल येते. त्यानंतर उत्तरा व कार्तिक या दोघांमध्ये जो संवाद घडतो त्या संवादातील भाषा अनलंकृत असून ती त्या दोघांच्या नाते संबंधातील काही सूक्ष्म ताण उघड करताना दिसते. ते संवाद असे.

कार्तिक : हो हो.... त्याचं मेल तर पूर्ण वाच. काय म्हणतोय बघ.

उत्तरा : (वाचून) येतोय तो. ऑगस्टमध्ये येतोय. माझ्याशी काहीतरी महत्त्वाचं बोलायचंय कॅन वुइ स्टे विथ यू फॉर अ व्हाइल ? वुई ? हे वुइ कोण ? आफ कोर्स यू कॅन स्टे विथ मी. मी तुला हॉटेलात उतरू देईन काय रे ! आय हॅव अ सरप्राइज फॉर यू. प्लीज रिप्लाय बट डोन्ट आस्क टू मेनी क्वेश्चन्स ॲट धिस मोमेंट. पेशन्स... पेशन्स... ओके ! (लॅपटॉप बंद करते. थोडा वेळ विचार करते.) कार्तिक...ऑगस्टमध्ये येणार आहे सायरस. माझ्या नव्या फिल्मच्या रिहर्सल्स चालू होतील तेव्हा. पण तू जरा जास्त अटेंड कर हं त्याला. खूप वर्षांनी परत येतोय तो मुंबईत. महिनाभर असेल म्हणतोय. म्हणजे आपल्या जायच्या वेळा बहुधा एकच येणार. मी सात सप्टेंबरला पुण्याला जाईन नव्या फिल्मच्या शुटिंगला. तू कधी जॉईन होतोयस?

कार्तिक : (मान खाली) दहा

उत्तरा : काय ?

कार्तिक : (ओरडतो) दहा. दहा सप्टेंबर सकाळी अकरा वाजता. इराणमध्ये अब्बास सांगितलय ना मघाशी ?

उत्तरा : ए... ओरडतोयस काय ? मध्येच काय झालं ?

कार्तिक : उत्तरा मी आता एकदम जानेवारीत परत येणार तू आता बंगलोरला चाललीयेस. निदान ऑगस्टमध्ये आपण थोडे एकत्र राहिलो असतो. सायरसला आपणच होस्ट केलं पाहिजे का आता?

उत्तरा : हो केलंच पाहिजे. कारण दोन पहिलं म्हणजे तुला कल्पना नाहीये सायरस मला किती जवळचा आहे. ते इतक्या वर्षांनी तो परत येतोय. मला माझी शेड्यूल्स सांभाळून त्याच्यासाठी जास्तीत जास्त केलंच पाहिजे. आणि दुसरं ! आता आपण नवीन लग्न झालं असल्यासारखं वागणं बद करूया. दोघंच तर असतो सतत इथे आपण. अजून तुला काय करायचंय एकटं माझ्याबरोबर बसून?

कार्तिक : उत्तरा, गेला दीड महिना मी घरी एकटा आहे. तू रात्री बारा-एकच्या आधी घरी परततेस.

उत्तरा : टिपिकल मॅन, कार्तिक बारा एकपर्यंत सेटवर खपत असते मी रोज. त्याबद्दल थोडे कौतुक निदान तुझ्या मनात असेल, असं वाटत असतं मला नेहमी. की काय करावं कार्तिक? पाच वाजता सेटवर पॅकप करायला सांगून येताना भाजी वगैरे घेऊन घरी येऊ? मग आपण समुद्रावर फिरायला जायचं. दोघंजण रोज? हे करायचंय का आपण? (पृष्ठे १९,२०)

प्रस्तुत नाटकातील पात्रे उच्चशिक्षित आहेत. बदलत्या सामाजिक वास्तवाचे त्यांना पुरेसे भान आहे. 'लिव्ह इन रिलेशनशीप' आणि 'गे रिलेशनशीप' या पात्रांनी तर सहजपणे स्वीकारलेली आहे. अशा प्रकारच्या रिलेशनशिपमध्ये वाटणारी चिंता त्यांनाही वाटत असली तरी ती चिंता त्यांच्या दैनंदिन जीवनाला धक्का लावताना दिसत नाही किंबहुना या संबंधाकडे ही पात्रे मोकळेपणाने पाहात असल्यामुळे आणि ती बदलत्या काळाला अनुरूप मिश्र-भाषक असल्यामुळे त्यांची संवाद-भाषा मराठी आणि इंग्लिश अशी दोन्ही प्रकारची आहे. अधेमध्ये इंग्लिश शब्दांचा वापर असे ह्या संवाद-भाषेचे स्वरूप नसून काही काही संवाद पूर्ण इंग्लिश भाषेतच असलेले दिसतात.

**उदाहरणार्थ,**

सायरस : यू नो, द मेयर इन सान्फ्रान्सिस्को हॅजॲक्चुअली लीगलाइजड गे मॅरेजेस लास्ट विंटर सो नाऊ वुई हैव ऑल दीज कपल्स फ्रॉम यूएसए, कॅनडा, फ्रॉम, यूरप-यु नो, ऑल कान्व्हरजिंग इन सान्फ्रान्सिस्को जस्ट टू गेट मॅरीड... ॲन्ड आय ॲम शुअर, हाफ ऑफ ॲमस्टरडॅम इज गोइंग टु बी डाऊन देअर, ॲण्ड यू नो, व्हाय दॅट ? इट इज बिकॉज ऑफ अवर आर्गनायझेशन टुडे ! इट इज बिकॉज ऑफ अस, दॅट गे पीपल कॅन ॲडॉप्ट चिल्ड्रन, दे कॅन नामिनेट देअर पार्टनर्स फॉर इन्शुअरन्स ॲण्ड कॅन हॅव प्रॉपर्टी राइटस् इट्स ऑल बिकॉज ऑफ अस... यू नो कॅनडा इज ओपन यार, बट इन्स्पाइट ऑफ दॅट, वुइ आर डबल मार्जिनलाइजड.(पृ.२५)

नाटककाराला एक वैशिष्ट्यपूर्ण विषयासंबंधी भूमिका घेणे महत्त्वाचे वाटल्याने घटना-निर्मिती पेक्षा परस्परांमधील संवादाना त्यांनी विशेष महत्त्व दिलेले दिसते. परस्परसंवाद आणि संवादाचे सातत्य आधोरेखित करण्यासाठी 'राहते घर' ही स्थलयोजना अर्थपूर्ण ठरते.

प्रस्तुत नाटकात व्योमचे पाली हिलवरील घर, कॉफी शॉप, शाळा, पब, इत्यादी स्थलांचा उल्लेख नाटकात येतो. पण ह्या स्थलांना नाटककारांनेच फारसे महत्त्व दिलेले दिसत नाही. उत्तरा व कार्तिक ह्यांच्या रिलेशनशिपला साधारणपणे सहा वर्षे होत आलेली आहेत. पण प्रत्यक्ष नाटकातील संवाद-घटनांचा कालावधी (Duration ) साधारणपणे पंधरा दिवसांचा असल्याचे दिसते. घटनांचा हा कालावकाश अत्यल्प असून बदलत्या मानवी जीवनातील अतिशय महत्त्वाच्या अशा दोन प्रश्नांविषयीचे सामाजिक-सांस्कृतिक आणि अंगभूतपणे राजकीय असलेले संदर्भ साकार होतात. हे नाट्यदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

**संदर्भसूची :**


- कुंडलकर, सचिन (२००५), 'छोट्याश्या सुट्टीत', (प.आ.), पुणे, कर्नाटक प्रकाशन.